# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/12/2023 (गुरूवार) दुपार

---

## महिला/मुलींचे छेडछाडीला आळा बसण्याकरीता नागपूर ग्रामीण जिल्हयात ०६ दामिनी पथक कार्यान्वित

मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयात प्रत्येक उपविभागीय स्तरावर महिलांच्या व मुलींचे छेडछाडी करणाऱ्या टवाळखोरांविरूद्ध कठोर कार्यवाही साठी दामिनी पथक पुर्ननियुक्त स्थापन केले असुन सदर पथक हे शाळा, कॉलेज गर्दीचे ठिकाण, बस स्टॅंड तसेच इतर महत्त्वाचे ठिकाणी महिलांशी हुल्लडबाजी व छेडछाड करणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवून त्यांच्याविरूद्ध कठोर कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता एकुण ०६ दामिनी पथके स्थापन केले असुन प्रत्येक विभागानुसार महिला पोलीस अधिकारी दामिनी पथकाच्या प्रमुख म्हणुन नेमण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे १) रामटेक उपविभागीय दामिनी पथक प्रमुख सपोनि येवले, मो. नं. ९०११६५५२८४ २) सावनेर उपविभागीय दामिनी पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक मोकासे, मो. नं. ८३८०८५०३५० ३) कन्हान उपविभागीय दामिनी पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक भुते, मो. नं. ८८२२५६६१८० ४) उमरेड उपविभागीय दामिनी पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक सुचिता मंडावले, मो. नं. ९७६३२३४५४८ ५) काटोल उपविभागीय दामिनी पथक प्रमुख महिला पोलीस उपनिरीक्षक पुनम कोरडे, मो. नं. ७२७६६३०४५५ ६) नागपूर उपविभागीय दामिनी पथक प्रमुख महिला पोलीस हवालदार पुनम देव्हारे मो. नं. ८७८८७९०८५८ असे असुन या व्यतिरीक्त प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर देखील दामिनी पथक असुन कोणत्याही महिला व मुलींशी हुल्लडबाजी व छेडछाडी करील त्यावेळी वरील मोबाईल क्रमांकावर फोन केल्यास तात्काळ पथक घटनास्थळी हजर होवुन सदर इसमांवर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच सदरचे दामिनी पथक हे विभागीय स्तरावर व पोलीस स्टेशन स्तरावर पेट्रोलींग व्दारे छेडछाडी व हुल्लडबाजी करणाऱ्यांवर आळा घालण्यासाठी लक्ष ठेवुन आहेत.

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा गाडेघाट रोड सूनिल सलून दूकानाचे समोरील रोडवर दिनांक २७/१२/२०२३ चे १०.४० वा. ते ११.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सैय्यद शाहरूख रेशमा सैय्यद, वय २६ वर्ष, रा. अशोक नगर वार्ड क्र. ०५ कन्हान हा त्याचे मित्रासह घटनास्थळी बसुन बोलत असतांना दोन मोटर सायकलवर प्रत्येकी ०३ असे ६ लोक हातात चाकू आणि दंडे घेवून आले यातील आरोपी नामे— १) विशाल नामदेव चिंचोडकर, रा. वार्ड क्र. ३ धरम नगर कन्हान याने फिर्यादीचा मित्र नामे— लक्की नाईक यास ''कल तू मूझको मारने आया था क्या'' असे बोलून त्यास शिवीगाळ देत असतांना यातिल दूसरा आरोपी नामे २) सूमेश भिमराव रामटेके, वय ३१ वर्ष, रा. वार्ड क्र. २ प्रगती नगर गहुहीवरा रोड कन्हान याने लक्की यास दंडयाने डाव्या हाताच्या मनगटावर मारत असतांना यातील फिर्यादी हा भांडण सोडविण्यासाठी गेला असता आरोपी विशाल चिंचोळकर याने त्यास अश्लिल शिवीगाळ देवून २ ते ३ वेळा चाकूने वार केले परंतू फिर्यादी ते वार हुकवून पळुन जात असतांना आरोपी विशाल चिंचोळकर याने फिर्यादीच्या डाव्या बाजूच्या कमरेच्या खाली चाकूने वार करून जख्मी केले फिर्यादी पळत असतांना यातिल आरोपी सुमेश आणि साथीदार नामे—३) अविनाश उर्फ लंगडा सूखचंद सहारे, वय २३ वर्ष, रा. वार्ड

क्र. २ तूकाराम नगर कन्हान ४) रितेश उर्फ पंम्प्या सूरेश चाहूके, वय २१ वर्ष, वार्ड क्र. २ प्रगती नगर गहुहीवरा रोड कन्हान व २ अनोळखी इसम यांनी दंडयांनी दोन्ही पायाला मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३०७, २९४, १४३, १४४, १४७, १४८, १४९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर घटनास्थळी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग कामठी मा. पोनि सार्थक नेहते पोस्टे कन्हान यांनी भेट दिली. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अमितकूमार आत्राम पोलीस स्टेशन कन्हान मो. क्रं. ९४०५१९४३१७ हे करीत असुन सदर गुन्हयातील आरोपी क्र. ०१) ते ४) यांना अटक करण्यात आली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**